# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ४५-२३** **दिनांक:- ०७/०२/२०२३**

## स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे भासवुन सर्वसामान्य जनतेची फसवणुक करणारा मुख्य आरोपी जेरबंद. गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांची कामगिरी.

दिनांक १३/०३/२०२१ ते दिनांक ०६/०७/२०२१ रोजी पावेतो फिर्यादी नामे हॅरेल पॅट्रिक साल्वीन वय ६९ वर्षे यांना रामसिंग देवडा, शुभम मिश्रा, सुरज दुबे, गौतम चौधरी व रुम मालक पुलक दास यांनी आपसांत संगणमत करुन रुम नं. ए/७०८, क्रिस्टल प्लाझो, यशवंत गौरव, नालासोपारा प. या रुम वर DHFL या बॅकेंचे थकीत कर्ज असताना देखील सदर रुमवर कोणत्याही प्रकारचे कर्ज नाही असे भासवुन सदरचा रुम रजिस्ट्रेशनद्वारे विक्री करुन फिर्यादी यांचेकडुन रुमकरीता एकुण १७,५०,०००/- रुपये चेकद्वारे घेवुन त्यांना आजपावेतो रुमचा ताबा न देता तसेच फिर्यादी यांनी रुम करीता दिलेले पैसे परत न करता त्यांची फसवणुक केल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणेत गुन्हा रजि नंबर ५५८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ,४२०, ३४ प्रमाणे नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई, विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासुन स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सर्वसामान्य नागरीकांची आर्थिक फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. त्याअनुषंगाने फसवणुकीचे गुन्हे नोंद करण्यात आले होते. सदर फसवणुकीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हयाची उकल करण्यासाठी वरिष्ठांनी गुन्हे शाखा, कक्ष ३ चे अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील मुख्य आरोपीत नामे रामसिंग जालमसिंग देवरा, वय २८ वर्षे, रा. विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक ०२/०२/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडे प्राथमिक तपास करता त्याने त्याचे इतर साथीदार यांचेबरोबर आपसात संगणमत करुन स्वस्त दरात घर विकत घेऊ इच्छीणा-या सर्वसामान्य नागरीकांना हेरुन त्यांची ५०,००,००० /- रुपयांची फसवणुक केले असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याने नमूद आरोपीतास गुन्हयात दिनांक ०२/०२/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याचा खालील नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

### :- उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १. | नालासोपारा पोलीस ठाणे. | ५५८/२०२२ | भा.द.वि.सं. कलम ४२०,३४ |
| २. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे. | २७९/२०२२ | भा.द.वि.सं. कलम ४२०,३४ |
| ३. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे. | ४३/२०२३ | भा.द.वि.सं. कलम ४२०,३४ |
| ४. | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे. | ५५/२०२३ | भा.द.वि.सं. कलम ४२०,३४ |
| ५. | नालासोपारा पोलीस ठाणे. | १७१/२०२२ | भा.द.वि.सं. कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ |

आरोपीत रामसिंग जालमसिंग देवरा हा नालासोपारा पोलीस ठाणे, गुन्हा रजि नंबर ५५८/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४२०, ३४ या गुन्हयामध्ये अटक असुन सद्या पोलीस कोठडी मध्ये आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नालासोपारा पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. उमेश भागवत, पो.हवा. शंकर शिंदे, अशोक पाटील, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, मसुब प्रविण वानखेडे, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३ यांनी केलेली आहे.

----oooo----